# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 07 February 2025

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं प्रमुख व्याजदर असलेल्या रेपोदरात २५ बेसीस पॉईंटची कपात केली असून, रेपोदर आता सहा पूर्णांक २५ शतांश टक्के करण्यात आला आहे. मुंबईत आज बँकेचे नवनियुक्त गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी द्वैमासिक पतधोरण आढावा जाहिर केला. जवळपास पाच वर्षांनंतर रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात कपात केली आहे. सहा सदस्यीय पतधोरण समितीची बैठक बुधवारपासून मुंबईत सुरु झाली, या बैठकीत रेपो दर कमी करण्यासंदर्भात सहमती झाल्याचं गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं.

जागतिक पातळीवरच्या अस्थिर परिस्थितीचं कारण देत रिझर्व्ह बँकेनं आज आर्थिक वृद्धीदरांच्या अंदाजातही कपात केली. चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर सहा पूर्णांक चार दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. आगामी आर्थिक वर्षाचा आर्थिक वृद्धीदराचा अंदाजही सहा पूर्णांक नऊ दशांश टक्क्यांवरुन, सहा पूर्णांक सात दशांश टक्के, इतका कमी करण्यात आला आहे. चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर चार पूर्णांक चार दशांश टक्के आणि पुढच्या आर्थिक वर्षात चार पूर्णांक दोन टक्के राहिल, असं मल्होत्रा यांनी सांगितलं.

बँकांमधले घोटाळे कमी करण्यासाठी बँकांच्या वेबसाइटच्या नावात बँक डॉट इन लावण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे. एप्रिलपासून याची सुरुवात होईल. त्यानंतर वित्तीय क्षेत्रातल्या इतर संस्थांच्या वेबसाइटच्या नावात एफ आय एन अर्थात फिन डॉट इन असा वापर केला जाईल. २४ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या यंदाच्या वित्तीय साक्षरता आठवड्याचा भर, आर्थिक निर्णय घेण्यासाठी आणि घरखर्चातली महिलांची भूमिका सक्षम करण्यासाठी असेल, असंही रिझर्व्ह बँकेनं जाहीर केलं आहे.

****

आदिवासी क्षेत्रात आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी सरकार विशेष प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज लोकसभेत सांगितलं. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार्याने केंद्र सरकार आदिवासी क्षेत्रात प्रत्येक नागरीकापर्यंत उत्तम आरोग्य सुविधा पुरवत असल्याचं त्यांनी सांगितलं. अन्य एका प्रश्नाच्या उत्तरार आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी, गेल्या ३० वर्षात देशात माता मृत्यू दर ८३ टक्क्यापर्यंत खाली आला असल्याचं सांगितलं.
राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत प्रत्येक राज्याला आर्थिक आणि इतर सहकार्य मिळत असल्यानं, यामुळे रुग्णांना वेळेत उपचार देणं शक्य होत असल्याचं पटेल यांनी सांगितलं.

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या उद्या होणाऱ्या मतमोजणीसाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आली असल्याचं, दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकारी आर. ॲलिस वाझ यांनी सांगितलं. मतमोजणीसाठी सुमारे पाच हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं आज एका भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. देशभरातले अनेक कलाकार यावेळी संगीत, नृत्य आदी कला प्रकारांचं सादरीकरण करणार आहेत.
दरम्यान, तीन नवीन फौजदारी कायद्यांविषयी लोकांना माहिती देण्यासाठी प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात डिजिटल प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. काही कलाकार पथनाट्याच्या माध्यमातून लोकांमध्ये त्यांचे हक्क आणि या कायद्यांबाबत जागरुकता निर्माण करत आहेत.

****

प्रसिद्ध क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी काल त्याच्या कुटुंबीयांसह राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात भेट घेतली. यावेळी राष्ट्रपती आणि सचिन तेंडुलकर यांनी अमृत उद्यानात फेरफटकाही मारला. त्यांनतर ‘राष्ट्रपती भवन विमर्श शृंखला’ या उपक्रमांतर्गत एका संवादात्मक सत्रात, तेंडुलकर यांनी क्रिकेटपटू म्हणून स्वतःच्या प्रवासातील किस्से उपस्थितांना सांगितलं.

****

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या सोमवारी १० फेब्रुवारीला संवाद साधणार आहेत. परीक्षेच्या ताणाचं व्यवस्थापन विद्यार्थ्यांना करता यावं या दृष्टीनं पंतप्रधान या कार्यक्रमातून मार्गदर्शन करतात. नवी दिल्लीच्या भारत मंडपम् मध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातले प्रत्येकी ३६ विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे काही खासदार पक्ष सोडणार असल्याच्या वृत्ताचं, या पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी खंडन केलं आहे. ते आज दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. इतर ज्वलंत विषयावरचं जनतेचं लक्ष विचलित करण्यासाठी खोट्या बातम्या पुरवल्या जात असल्याचा आरोपही सावंत यांनी केला. खासदार अनिल देसाई, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाघचौरे, संजय जाधव यांच्यासह ठाकरे गटाचे आठ खासदार यावेळी उपस्थित होते.

****

गडचिरोली इथलं लोहखनिज उच्च दर्जाचं असून, त्यावर प्रक्रिया उद्योग येत आहेत, येत्या पाच वर्षात गडचिरोली देशातलं स्टील हब म्हणून उदयास येईल, अशी आशा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ते आज नागपूर इथं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसरात होत असलेल्या, एडवांटेज विदर्भ या तीन दिवसीय औद्योगिक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

****